गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

## शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

## “वार्षिक अहवाल”

**(शैक्षणिक सत्र २०१७-१८)**

## <u>‘नियमित कार्यक्रम’</u>

-: सादरकर्ते :-

**प्रा. अमर सुभाष कुरील**

**रा.से यो. कार्यक्रम अधिकारी**

**शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली**

**२०१७-१८**

**शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली**

## राष्ट्रीय सेवा योजना

## 'आंतराष्ट्रीय योग दिन'

**२१ जुन २०१७**

जागतिक तिसऱ्या 'आंतराष्ट्रीय योग दिन' २१ जुन चे औचित्य साधून राष्ट्रीय सेवा योजना विभाग तर्फे शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली इथे योग दिन साजरा करण्यात आला.या कार्यक्रमाचे संचालन प्रा. अमर कुरील, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले,त्यांनी या विशेष दिनाचे महत्व आणि फायदे सुद्धा सांगितले.जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे योग प्रात्याक्षिकेसाठी श्रीमती सपना खोब्रागडे आणि श्रीमती रेखा गुळकर यांची नेमणूक करण्यात आली.महाविद्यालायाच्या प्रांगणात सकाळी ६:०० वाजेपासून या दोन्ही नेमणूक महिलांनी योगाची प्रात्याक्षिके,विविध आसने आणि प्रत्येक आसन शरीर निरोगी राहण्यास कसे मदत करते,त्याचे महत्व सुद्धा सांगितले.

या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जि.एल. वाघमारे, प्रा. अमर कुरील रासेयो कार्यक्रम अधिकारी, डा. गणात्रा, डा. कळंबे, डा. दुधे डा. साळुंखे ,डा. मंदार पैगणकर, डा. अबरार अहेमद व डा. मुर्हेकर हि प्राध्यापक मंडळी तसेच शिक्षकेत्तर कर्मचार श्री प्रकाश फटिंग, श्री मोहन गाठे, श्री सुटे, श्री मुंडके. श्री निळकंठ खोब्रागडे, श्री दादाराव अन्द्रस्कर उपस्थित होते आणि मुख्य म्हणजे महाविद्यालयीन परिसरातील इतर नागरिक मुख्यता महिला मंडळ आणि लहान शालेय मुले सुद्धा उपस्थित होती.

हा कार्यक्रम प्रा. अमर कुरील रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन इतर विद्यार्थ्यांच्या सहायाने पार पाडला.











**‘आंतराष्ट्रीय योग दिन’ २१ जुन ला योग प्रात्याक्षिके सांगताना श्रीमती सपना खोब्रागडे आणि श्रीमती रेखा गुळकर आणि सहभागी सर्व महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी,रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन परिसरातील इतर नागरिक.**

देशोन्नती शहर ६ गुरुवार, दि . २२ जून २०१७
epaper.deshonnati.com

## ■ ■ जिल्ह्यात सर्वत्र 'करे योग, रहे निरोग' चा निनाद ■ ■

ePaper देशोन्नती Thu, 22 June 2017
deshonnati.digitaledition.in/c/19984458



गडचिरोली : शासकीय विज्ञान महाविद्यालयात आयोजित योगदिनास सपना खोब्रागडे, रेखा गुळकर, प्राचार्य डॉ. वाघमारे, प्रा. पैंगणकर, डॉ. अहमद, डॉ. मुर्रेकर आदी उपस्थित होते.

ePaper देशोन्नती Thu, 22 June 2017
deshonnati.digitaledition.in/c/19984410

## शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली

# राष्ट्रीय सेवा योजना

### "वृक्षा रोपण"- ०१ जुलै २०१७

शासकीय विज्ञान महाविद्यालयीन परिसरात महाराष्ट्र शासन आदेशान्वये परिसरात **"वृक्षा रोपण"** चा कार्यक्रम दिनांक ०१ जुलै ला हिरहिरीने व आनंदात साजरा करण्यात आला. संपूर्ण **महाराष्ट्रात ४ कोटी वृक्षारोपणाचा** संकल्प शासनाने हाती घेतला असून त्यात एक अल्पसा योगदान शासकीय विज्ञान महाविद्यालयाच्या तर्फे पर्यावरणात देण्यात आला.

महाविद्यालयीन परिसरात पर्यावरणाचा समतोल,विविध वृक्षांचा व सजीवांचा विचार करून विविध दहा प्रकारची अशी एकूण १०० लहान-मोठे वृक्षारोपण करण्यात आले.त्यामध्ये आंबा, फणस, चिकू, कागजी लिंबू, काजू, शेवगा, करंज, गुलमोहर, कडू नीम, चिंच आणि तसेच वनौषधी म्हणुन रुलीगन,अडुळसा व गुगळ यांचे अनुक्रमे महाविद्यालयीन परिसरात व वनौषधी बागेत वृक्षा रोपण करण्यात आले. महाविद्यालयाचे प्राचार्य डा. जि. एल. वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम प्रा. अमर कुरील, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन इतर विद्यार्थ्यांच्या सहायाने पार पाडला.

या कार्यक्रमात महाविद्यालयातील डा. गणात्रा, डा. कळंबे, डा. दुधे डा. साळुंखे ,डा. मंदार पैगणकर, डा. अबरार अहेमद व डा. मुर्हेकर हि प्राध्यापक मंडळी तसेच शिक्षकेतर कर्मचार श्री प्रकाश फटिंग, श्री मोहन गाठे, श्री सुटे, श्री मुंडके. श्री निळकंठ खोब्रागडे व श्री .दादाराव अन्द्रस्कर उपस्थित होते.

तसेच या कार्यक्रमाच्या सफल यशासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी महाविद्यालयीन रासेयो स्वयंसेवक व महाविद्यालयीन इतर विद्यार्थ्यांच्यांचे मोलाचे सहकार्य लाभले.





**महाविद्यालयीन परिसरात 'वृक्षा रोपण' करतांना शिक्षक व रासेयो स्वयंसेवक ०१ जुलै २०१७**

**शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली**

# राष्ट्रीय सेवा योजना

## "मध्यवर्ती बसस्थानक स्वच्छता अभियान"

**१२ ऑगस्ट २०१७**

रासेयो विभाग, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली यांच्या द्वारे आयोजित 'स्वच्छता पखवाडा' (०१ ते १५ ऑगस्ट २०१७) अंतर्गत 'मध्यवर्ती बसस्थानक स्वच्छता' आणि 'रेली' चे आयोजन दिनांक - शनिवार, १२ ऑगस्ट २०१७ रोजी सकाळी १० वाजता स्थानिक शिवाजी महाविद्यालय इथे करण्यात आले.या कार्यक्रमात रासेयो विभाग, शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली नी इतर स्थानिक महाविद्यालया तसेच पद्वुत्तर विभाग गोंडवाना विद्यापीठ सोबत आपला विशिष्ठ सहभाग दर्शविला.

या कार्यक्रमासाठी माननीय डॉ. एन.वि.कल्याणकर कुलगुरू, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली हे अध्यक्षीय स्थानी होते, तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भूपेश चिकटे, प्राचार्य शिवाजी महाविद्यालय, गडचिरोली आणि डॉ. हंसा तोमर, प्राचार्य महिला महाविद्यालय, गडचिरोली म्हणून उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन डॉ. नरेश मडावी, समन्वयक रासेयो विभाग, गोंडवाना विद्यापीठ यांनी केले.यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा व उद्दीष्टे थोडक्यात सांगितले. अध्यक्षीय भाषणात डॉ. एन.वि.कल्याणकर ,कुलगुरू यांनी 'कथनी पेक्षा करणी' यावर अधिक जोर दिला.आजच्या काळात युवाशक्तीनी कर्म करून कार्यसिद्ध करण्याचे आवाहन केले.शहरी व ग्रामीण आरोग्य,स्वच्छता, आणि रोग प्रतिकार शक्ती यांच्यातील फरक सांगितला. स्वच्छ पर्यावरनाचे महत्व किती आवश्यक आहे ते योग्य उदाहरणांनी पटवून सांगितले.घरातील स्वच्छता प्रमाणे घराबाहेरील स्वच्छतासुद्धा आवश्यक असल्याचे सांगितले.तसेच प्रमुख अतिथी म्हणून डॉ. भूपेश चिकटे, प्राचार्य शिवाजी महाविद्यालय यांनी स्वच्छतेचा माणसाच्या शारीरिक आणि मानसिक विकासावर होणार अनुकूल परिणाम सांगितला. डॉ. हंसा तोमर, प्राचार्य महिला महाविद्यालय यांनी सुद्धा सदर कार्यक्रमावर थोडक्यात आपले विचार मांडले.

डॉ. नरेश मडावी यांच्या सोबत डॉ. खुने सर, शिवाजी महाविद्यालय यांनी सुद्धा भारतीय समाजात स्वच्छतेचा पाया रोवणारे समाज सुधारक गाडगे महाराज यांची सर्वांना आठवण करून दिली.

त्यानंतर कार्यक्रमासाठी इतर स्थानिक महाविद्यालयातील सर्व रासेयो स्वयंसेवकांना माननीय डॉ. एन.वि.कल्याणकर सरांनी हिरवी झेंडी दाखवून 'रेली' व 'स्वच्छता अभियान' ला सर्वात करवून दिली. सदर रेलीचा मार्ग शिवाजी महाविद्यालय ते इंदिरा गांधी चौक ते मध्यवर्ती

बसस्थानक असा होता व या विशेष रेली चे नेतृत्व रासेयो पथक, शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली च्या स्वयंसेवकांनी केला. रेली आपल्या नियोजित मार्गांनी ठरलेल्या ठिकाणी आपल्या कार्यउद्धीष्ठाच्या पुर्ततेसाठी पोहचली. आलेल्या सर्व स्वयंसेवकांनी गट बनवून त्यांनी वेगवेगळ्या जागेची स्वच्छता केली. स्वयंसेवकांनी प्लास्टिक पिशव्या, पन्न्या, खराब पाणी बॉटल गोळा केली व त्याची योग्य विल्वेवाट लावली इतर विविध कागदी सुखा कचरा गोळा करून त्याची होळी केली.

रासेयो स्वयंसेवक, शासकीय विज्ञान महाविद्यालय यांनी बसस्थानक परिसरातील मुख्य मार्गातील इतर अनावश्यक वनस्पतींचे उच्चाटन केले व स्वच्छता अभियानात मोठ्या हिरहीरीने भाग घेतला. तसेच या अभियानासाठी इतर स्थानिक महाविद्याल म्हणजे शिवाजी महाविद्यालय , फुले-आंबेडकर समाज कार्य महाविद्यालय , महिला महाविद्यालय , इंदिरा गांधी महाविद्यालय तसेच पद्वुत्तर विभाग, गोंडवाना विद्यापीठाचे रासेयो स्वयंसेवक, रासेयो कार्यक्रम अधिकारी सुद्धा हजर होते यांनी आपला विशिष्ठ सहभाग दर्शविला व स्वच्छता अभियान यशस्वी होण्यासाठी महत्वाची भूमिका बजावली.

स्वच्छता अभियान साठी शासकीय विज्ञान महाविद्यालयातूनच सर्व रासेयो स्वयंसेवकांची रेली शिवाजी महाविद्यालया पर्यंत आणि अभियान संपन्ने नंतर परत सदर मार्गाने महाविद्यालयात सांगता करण्यात आली.






**“मध्यवर्ती बसस्थानक स्वच्छता अभियान” १२ ऑगस्ट २०१७ साठी महाविद्यालयातून निघतांना सर्व रासेयो स्वयंसेवक प्रा. अमर कुरील, रासेयो कार्यक्रम अधिकारी.**

















**"मध्यवर्ती बसस्थानक स्वच्छता अभियान" १२ ऑगस्ट २०१७ मधील विविध क्षणांचे छायाचित्र.**




**रासेयो स्वयंसेवक, शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली**

**शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली**

# राष्ट्रीय सेवा योजना

## "हरित सेना (Green Army) नोंदणी मार्गदर्शन"

## व "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा "

**१२ ऑगस्ट २०१७, शनिवार**

वन विभाग गडचिरोली, कल्पतरू बहुउद्देशीय संस्था, गडचिरोली आणि रासेयो विभाग, शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित एक दिवसीय "हरित सेना (Green Army) नोंदणी मार्गदर्शन" व "स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा" चे आयोजन दिनांक - शनिवार, १२ ऑगस्ट २०१७ रोजी दुपारी १२:३० वाजता महाविद्यालयातील श्रोतगृहात करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी माननीय डॉ. जि.एल. वाघमारे, प्राचार्य शासकीय विज्ञान महाविद्यालय,गडचिरोली हे अध्यक्षीय स्थानी होते, तसेच प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून श्री. अमोल पऱ्हाड, सहाय्यक वन संरक्षक, गडचिरोली, श्री. कुणाल पडलवार, संस्थापक कल्पतरू बहुउद्देशीय संस्था, गडचिरोली आणि श्री. काळे आणि डॉ. सयेद अबरार अहेमद, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख सुद्धा उपस्थित होते.

कार्यक्रमाचे संचालन प्रा. अमर कुरील, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी या कार्यक्रमाची रूपरेषा व उद्दीष्टे थोडक्यात सांगितले. श्री. काळे यांनी विद्यार्थ्यांना पदवी परीक्षेच्या अभ्यासासोबत स्पर्धा परीक्षेच्या अभ्यासाचे नियोजन करण्यास सांगितले.विविध स्पर्धा परीक्षा, त्यांचे स्तर, अभ्यासक्रम व त्यासाठी लागणारे मुख्य वाचन साहित्य,चालू घडामोडी, दैनिक समाचार पत्र यांचा वाचन करण्यास सांगितले. त्यानंतर श्री. कुणाल पडलवार, संस्थापक कल्पतरू बहुउद्देशीय संस्था यांनी सुद्धा सदर कार्यक्रमात विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण मार्गदर्शन केले. श्री. पडलवार यांनी विद्यार्थ्यांना हरित सेना (Green Army) ची पार्श्वभूमी, गरज व उद्देश स्पष्ट केले.पर्यावरणाचा होणारा ह्रास, धासलणारा तोल थांबविण्यासाठी हरित सेना ची आवश्यकता सांगितले.आपल्या परिसरातील होणाऱ्या वृक्षांची कत्तल थांबविण्यासाठी, त्याचे लागवड व संवर्धन करण्यासाठी हरित सेनाच्या माध्यमातून करण्यासाठी विद्यार्थ्यांना हरित सेनेत नोंदणी करण्यास प्रेरित केले, त्यासाठी महाविद्यालयात ऑन लाईन सुविधा उपलब्ध केल्या जाईल असे संगितले. एक आपली काही सामाजिक बांधिलकी म्हणून या योजनेत सहभागी होण्यासाठी आवाहन केले.

श्री. पडलवार यांनी UPSC,MPSC,IFS,MFS अश्या स्पर्धा परीक्षा यांची थोडक्यात अहर्ता, परीक्षेचे स्वरूप आणि मुलाखतीचे तंत्र या वर माहिती दिली.

तसेच प्रमुख अतिथी व मार्गदर्शक म्हणून लाभलेले श्री. अमोल पऱ्हाड , सहाय्यक वन संरक्षक, गडचिरोली यांनी स्पर्धा परीक्षा सोबत स्वतःचे अनुभव, महाविद्यालायीन वेळेचे नियोजन आणि १४ ते १५ तास केलेला अभ्यास सुद्धा विद्यार्थ्यांसोबत अनुभवले.

महाराष्ट्र वन सेवा (MFS) साठी व इतर स्पर्धा परीक्षा लागणारी तैय्यारी,नियोजन,एकाग्रता यावर विविध रोचक व योग्य पद्धतीने मार्गदर्शन केले. आयुष्याच्या सुरवातीच्या काही काळात, तारुण्यपणी प्रचंड मेहनत करून नंतरचे आयुष्य सुखमय करता येते असे सांगितले.काही विद्यार्थ्यांच्या प्रश्नांचे निराकरण सुद्धा केलेत. योग्य प्रकारे अभ्यास केल्यास १०० टक्के यश प्राप्त होते हे सांगितले.

डॉ. सयेद अबरार यांनी सुद्धा विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक युगात आत्मविश्वास ठेवण्यास सांगितले व त्यांना शुभेच्छा दिल्या.

डॉ. जि.एल. वाघमारे, प्राचार्य यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्पर्धा परीक्षेत यश प्राप्त करून शारीरिक,मानसिक आणि आर्थिक विकासाची सांगड घालावी आणि स्वतःची,आपल्या परिवाराची उन्नती करावी असे प्रतीपादन केले.तसेच महाविद्यालयातील असणाऱ्या विविध स्पर्धा परीक्षेची पुस्तकांचा भरपूर वापर करण्यास सांगितले व त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. अमर कुरील, रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी केले. महाविद्यालयातील भरपूर विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेत उपस्थिती दाखविली. कार्यक्रमाच्या यशासाठी वन विभाग, कल्पतरू संस्था मधील कर्मचारी आणि महाविद्यालयातील श्री. प्रकाश फटिंग,श्री. निळकंठ खोब्रागडे आणि श्री. मोहन गाठे यांनी अथक परिश्रम घेतले.





**श्री. कुणाल पडलवार, संस्थापक कल्पतरू बहुउद्देशीय संस्था, गडचिरोली महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना.**




**“हरित सेना (Green Army) नोंदणी मार्गदर्शन” व “स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन कार्यशाळा” १२ ऑगस्ट २०१७, शनिवार मार्गदर्शन करतांना श्री. अमोल पऱ्हाड, सहाय्यक वन संरक्षक, गडचिरोली.**












**‘गांधी जयंती आणि लाल बहादूर शास्त्री जयंती’ -०२ ऑक्टोबर निमित्त आयोजित ‘स्वच्छता अभियान’ आणि मार्गदर्शन पर ‘व्याख्याना’चे आयोजन दिनांक ०२/१०/२०१७**

# देशोन्नती

वैचारिक क्रांतीचा अग्रदूत

नागपूर मंगळवार, दि.३ ऑक्टोबर २०१७ पृष्ठे ८+८ मूल्य ₹:५

ePaper देशोन्नती Tue, 03 October 2017
deshonnati.digitaledition.in//c/22610025

RDx शहर

Read Daily Exclusive

जलयुक्त शिवार मोहीमेतून उंचावणार शेतकऱ्यांचे जीवनमान 6 वर

राजवाड्यातील दुर्गा मातेचे थाटात विसर्जन 8 वर

गडचिरोली / मंगळवार दि. ३ ऑक्टोबर २०१७ देशोन्नती

वर्तमानपत्र कसे असावे ?
राजकीय पक्षांचं मुखपत्र की खरंखुरं निष्पक्ष वृत्तपत्र ?
निर्णय तुमचाच देशोन्नती

ePaper देशोन्नती Tue, 03 October 2017
deshonnati.digitaledition.in//c/22609733

# आत्मोन्नतीपासून जागतिक उन्नतीचा मुलमंत्र

## ◆ डॉ. गणात्रा यांचे प्रतिपादन ◆ शासकीय विज्ञान महाविद्यालयात व्याख्यान



**प्रतिनिधी/** *२ ऑक्टोबर*

**गडचिरोली :** अहिंसा व आत्मउन्नती हाच जागतिक उन्नतीचा मुलमंत्र असून शांततेतून स्वतःची, समाजाची, देशाची व जगाची प्रगती साधता येते, असे प्रतिपादन शासकीय विज्ञान महाविद्यालयाचे रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. सुनिल गणात्रा यांनी केले.

स्थानिक शासकीय विज्ञान महाविद्यालयात आज २ ऑक्टोबर रोजी गांधी जयंतीचे औचित्य साधून 'महात्मा गांधीजींचे विचार- काळाची गरज' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.वाघमारे होते.

कार्यक्रमापुर्वी महाविद्यालयात स्वच्छता मोहिम राबविण्यात आली. स्वच्छता अभियान महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांकडून राबविण्यात आले. डॉ.गणात्रा यांनी आपल्या व्याख्यानात आत्मशोध व समाधानी होण्याचा मार्ग सांगितला. प्रत्येक गोष्टीचा फायदा स्वतःपुरता न करता प्रत्येक समाज घटकापर्यंत कसा देता येईल हे सांगून महात्मा गांधी यांचे 'जिवनाभिमुख शिक्षण' काळाची गरज असल्याचे सांगितले.

'स्किल इंडिया' ही गांधीजीची विचारधारा व कृतीचे फलीत असून ही संकल्पना साकारल्यास जगाचे कल्याण होईल, असेही डॉ.गणात्रा यावेळी म्हणाले. संचालन व आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा.अमर कुरील यांनी केले.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ.पैगणकर, डॉ.अबरार, लोखंडे, फटींग, खोब्रागडे अडूस्कर यांनी सहकार्य केले. कार्यक्रमाला विद्यार्थी उपस्थित होते.

ePaper देशोन्नती Tue, 03 October 2017
deshonnati.digitaledition.in//c/22609506

गडचिरोली TODAY सकाळ

बुधवार
४ ऑक्टोबर २०१७
कमाल 33.0° / किमान 24.0° C

सकाळ
गडचिरोली, बुधवार
४ ऑक्टोबर २०१७
४

# शासकीय विज्ञान महाविद्यालयात स्वच्छता मोहीम

**गडचिरोली, ता. ३ :** राष्ट्रपिता महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांच्या जयंतीनिमित्त सोमवारी (ता. २) स्थानिक शासकीय विज्ञान महाविद्यालयात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली.

यावेळी आयोजित कार्यक्रमात रसायनशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुनील गणात्रा यांच्या 'महात्मा गांधींचे विचार : काळाची गरज' या विषयावर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एल. वाघमारे होते. डॉ. गणात्रा यांनी महात्मा गांधी यांच्या जीवनकार्याची माहिती देत त्यांच्या विचारांची आजही गरज असून त्यांचे विचार अंगीकारण्याचे आवाहन केले.



गडचिरोली : महाविद्यालय परिसरात स्वच्छता करताना विद्यार्थी व कर्मचारी.









**‘रक्तदान शिबीर’ आणि ‘वैद्यकीय तपासणी शिबीर’ दिनांक- ०८ आणि ०९ डिसेंबर २०१७**

लोकमत



# आरोग्य तपासणी व रक्तदान शिबिर

**गडचिरोली :** शासकीय विज्ञान महाविद्यालयाच्या रासेयो विभाग व जिल्हा रुग्णालयाच्या वतीने विज्ञान महाविद्यालयात रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर ८ व ९ डिसेंबर घेण्यात आले. यावेळी बीएस्सी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली. यात हिमोग्लोबिन, सिकलसेल, रक्तगट आदींचा समावेश आहे. तसेच घेण्यात आलेल्या रक्तदान शिबिरात अनेकांनी रक्तदान केले. कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. जी. एल. वाघमारे, डॉ. व्ही. राऊत, प्रा. अमर कुरील, डॉ. अनिल रुडे, डॉ. शैलजा मैदमवार, अनिल घोडमारे, लोखंडे, बादल मेश्राम, नीता बालपांडे, श्रीकांत वानखेडे, प्रफुल रामटेके उपस्थित होते. कार्यक्रमाचे संचालन सूर्यकांत बारसागडे तर आभार सेजल राजगडकर यांनी मानले.

Hello Gadchiroli
Page No. 3 Dec 11, 2017
Powered by: erelego.com

RDx शहर

Read Daily Exclusive

क्रिडा संमेलनातून विद्यार्थ्यांच्या बुध्दीला चालना मिळते 6 वर

अहेरी तालुक्यातील धान खरेदीची कोंडी कायम 8 वर

देशोन्नती सोमवार, दि. ११ डिसेंबर २०१७

ePaper देशोन्नती Mon, 11 December 2017 deshonnati.digitaledition.in//c/24454854


# रक्तदान हे समाज सेवेचे एक प्रभावी माध्यम

## ◆डॉ. जी.एल. वाघमारे यांचे प्रतिपादन

***प्रतिनिधी/*** *१० डिसेंबर*

**गडचिरोली :** रक्तदान हे श्रेष्ठादान असुन राष्ट्रीय सेवा योजनेच्या माध्यमातुन रक्तदान करून समाज सेवा घडत असते. त्यामुळे रक्तदान हे समाज सेवेचे एक प्रभावी माध्यम आहे. असे प्रतिपादन डॉ. जी.एल. वाघमारे यांनी केले.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग शासकीय विज्ञान महाविद्यालय, गडचिरोली व रक्तपेढी विभाग, जिल्हा शासकीय रूग्णालय गडचिरोली यांच्या संयुक्त विद्यमाने शासकीय विज्ञान महाविद्यालय येथे रक्तदान शिबीर व वैद्यकीय तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते अध्यक्षस्थानावरून बोलत होते.

यावेळी शिबीराला प्रमुख अतिथी म्हणुन डॉ. व्ही. राऊत, प्रा. अमर कुरील, डॉ. मैदमवार, तंत्रज्ञ अनिल घोडमारे, अधिपरिचारिका लोखंडे, बादल मेश्राम, निता बालपांडे, सिकलसेल तपासणी व हिंद लॅबचे प्रफुल रामटेके, जिल्हा समन्वयक श्रीकांत वानखेडे आदी उपस्थित होते.



याप्रसंगी शिबीरामध्ये बि.एस्सी भाग - १ च्या सर्व विद्यार्थ्यांची हिमोग्लोबीन, सिकलसेल, रक्त गट तपासणी करण्यात आली. तसेच रक्तदान करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन सुर्यकांत बारसागडे यांनी केले. तर आभार सेजल राजगडकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजना स्वंयसेवक आदीनी सहकार्य केले.


ePaper देशोन्नती Mon, 11 December 2017 deshonnati.digitaledition.in//c/24454785










**‘राष्ट्रीय युवा दिन’ आणि ‘राजमाता जिजाऊ जयंती’- १२ जानेवारी २०१८**

**आय.आय.टी. जाम -२०१८ (IIT JAM-2018) 'कार्यशाळा', दिनांक- ११ जानेवारी २०१८**











**'सायबर गुन्हा' या विषयावर मार्गदर्शनपर व्याख्यान श्री. कमलेश वालदे,ICICI Bank, गडचिरोली**

**दिनांक- १९ जानेवारी २०१८**










**'राष्ट्रीय विज्ञान दिन'- २८ फेब्रुवारी गडचिरोली शहरातील शालेय विध्यार्थ्यांसाठी 'प्रयोग शाळा भेटीचे' आयोजन दिनांक- २८ फेब्रुवारी २०१८**

लोकमत
हॅलो गडचिरोली
गुरुवार, दि. ८ मार्च २०१८



# विज्ञान महविद्यालयात मार्गदर्शन

**गडचिरोली :** येथील शासकीय विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग, रसायनशास्त्र विभाग व प्राणीशास्त्र विभागाच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना विज्ञान विषयातील प्रात्यक्षिके करून दाखविण्यात आली. तसेच विज्ञानातील मूलभूत माहिती व संकल्पना पटवून देण्यात आल्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. जी. एल. बाघमारे होते. प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विवेक राऊत, डॉ. सुनील गाणात्रा, डॉ. प्रकाश किरकिरे, प्रा. अमर कुरील उपस्थित होते. वनस्पतींची जीव प्रक्रिया, जडणघडण, कीटकभक्षी वनस्पतींची माहिती, औषधी वनस्पती, रसायनांची ओळख करून देण्यात आली. याप्रसंगी चित्रीकरणाचे सादरीकरण करून प्रत्यक्ष मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन दीप्ती सहदेवकर तर आभार समीक्षा बंडावार यांनी मानले. यशस्वीतेसाठी डॉ. अबरार अहमद, डॉ. मंदार पैगणकर, डॉ. अशोक कळंबे, डॉ. विवेक राऊत यांच्यासह शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी सहकार्य केले.